कोरोना २०२० / सूचना / आदेश क्र. १४१

महाराष्ट्र शासन

**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग**

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २७/०३/२०२०

**अतितात्काळ**

प्रति,

**१) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल**

**२) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पेण**

**विषय :- कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी व त्यानुषंगाने कार्यवाही तातडीने करणेबाबत.**
**टेम्पो ट्रॅव्हलर उपलब्ध करुन देणेबाबत.**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.

आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० अन्वये अधिसूचना लागू करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाय योजना करण्यात येत आहेत.

करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी दवाखान्यातील स्टाफ, सरकारी कार्यालयातील कर्मचारी विविध प्रकारचे कामकाज करीत आहे तसेच पोलिस विभागातील पोलिस कर्मचारी यांना जिल्हयात, तालुक्यात बंदोबस्तासाठी लावणेत आलेले आहेत.परंतु जिल्हयात संचारबंदी लावण्यात आलेली असल्याने आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात तसेच इतर ठिकाणी पोहोचणे अडचणीचे होत आहे.

तरी पोलिस विभागातील कर्मचारी, दवाखान्यातील स्टाफ, महसूल विभागातील कर्मचारी तसेच इतर शासकीय कार्यालयातील कर्मचारी यांना त्यांच्या कामाचे ठिकाणी पोहोचविण्यासाठी आपण आपल्या स्तरावरुन जिल्हयातील प्रत्येक तालुकानिहाय एक टेम्पो ट्रॅव्हलर प्रत्येक तहसिलदार कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात यावी. जेणेकरुन संबंधित विभागाचे कर्मचारी यांना त्यांचे कामाचे ठिकाणी पोहोचण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होणार नाही. याचे देयक विभागीय आयुक्त कार्यालयामार्फत दिले जाणार आहे. हे कार्यालय इंधनाचा खर्च करेल.

( निधी चौधरी )
**जिल्हाधिकारी रायगड**



Scanned with CamScanner